**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः अथर्व हरिश्चंद्र पाटील,

वयः ३६ वर्षे, व्यवसायः नोकरी, पोलिस ह.ब.क्र.८५२,

राहणारः वाकण, ता. रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांचे मार्फत शपथेवर सुरु**

०१. दिनांक २५/१०/२०१८ रोजी मी पोलिस स्टेशन, कोलाड येथे कार्यरत होतो. त्यावेळी खांब ग्रामपंचायतने त्यांचे हद्दीमध्ये अवैध धंदे बंद करण्याचे अनुषंगाने गावामध्ये सभा घेउन त्यासंबंधी अर्ज पोलिस स्टेशनला सादर केला होता. सदर अर्जातील मजकूराप्रमाणे मी, पोलिस कर्मचारी श्री. माने, श्री. गव्हाणकर, व दोन पंच सदानंद जाधव व सुरेश वाघमारे मिळून खाजगी वाहनाने खांब नाका येथे गेलो. तेथे पोहचल्यानंतर पंचांनीआरोपीकडे बोट दाखवून तो दारु विक्री करित असल्याचे आम्हाला सांगितले. त्यानंतर मी त्याला पकडले. ती वेळ सकाळी १०.३० ची होती. त्यांनतर त्याचे ताब्यातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये आम्हाला जी एम संत्रा कंपनीच्या १८० मि.ली मापाच्या २१ बॉटल दारु मिळाली. श्री माने यांनी सदर दारु जप्त करुन त्यापैकी एक बॉटल सि.ए. परिक्षणाकरिता वेगळी सिलबंद कली. आरोपीकडे सदर मुद्देमालाचे अनुषंगाने परवान्यासंबंधी विचारणा केली असता तो नसल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर आम्ही आरोपी व जप्त मुद्देमाल घेउन पोलिस स्टेशनला परत आलो. तेथे

मी घटनेचे अनुषंगाने फिर्याद दिली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येतो. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपासणी पूर्ण.

**उलटतपासणी आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी. सानप यांचेमार्फत.**

०२. हे मला माहिती नाही की, मोक्यावर बनावट ग्राहक पाठविला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ खांब गावामधील अंतर्गत रस्त्याला लागून आहे, घटनास्थळाचे बाजूला चायनिजची टपरी आहे, त्यामुळे तेथे लोकांचा वावर असतो, तेथे आजूबाजूला इतर नागरिकांची घरे आहेत.

०३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५/१०/२०१८ रोजी मी पोलिस स्टेशन, कोलाड येथे कार्यरत नव्हतो, त्यावेळी खांब ग्रामपंचायतने त्यांचे हद्दीमध्ये अवैध धंदे बंद करण्याचे अनुषंगाने गावामध्ये सभा घेउन त्यासंबंधी अर्ज पोलिस स्टेशनला सादर केला नव्हता, सदर अर्जातील मजकूराप्रमाणे मी, पोलिस कर्मचारी श्री. माने, श्री. गव्हाणकर, व दोन पंच सदानंद जाधव व सुरेश वाघमारे मिळून खाजगी वाहनाने खांब नाका येथे गेलो नव्हतो, तेथे पोहचल्यानंतर पंचांनीआरोपीकडे बोट दाखवून तो दारु विक्री करित असल्याचे आम्हाला सांगितले नव्हते, त्यानंतर मी त्याला पकडले नव्हते, ती वेळ सकाळी १०.३० ची नव्हती, त्यांनतर त्याचे ताब्यातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये आम्हाला जी एम संत्रा कंपनीच्या १८० मि.ली मापाच्या २१ बॉटल दारु मिळाली नव्हती, श्री माने यांनी सदर दारु जप्त करुन त्यापैकी एक बॉटल सि.ए. परिक्षणाकरिता वेगळी सिलबंद केली नव्हती, आरोपीकडे सदर मुद्देमालाचे अनुषंगाने परवान्यासंबंधी विचारणा केली असता तो नसल्याचे त्याने सांगितले

नव्हते, त्यानंतर आम्ही आरोपी व जप्त मुददेमाल घेउन पोलिस स्टेशनला परत आलो नव्हतो, तेथे मी घटनेचे अनुषंगाने फिर्याद दिली नव्हती, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपासणी पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.07.03 15:13:47 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०३.०७.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.